आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१७ मे २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ पाठवणार

- आयएसआय दहशतवादी संघटनेतल्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना मुंबई विमानतळावर अटक

- एका आठवड्यानंतर आयपीएल क्रिकेट स्पर्धा पुन्हा सुरू / बेंगळुरू मधे रंगणार रॉयल चॅलेंजर्स विरुद्ध कोलकाता नाईटरायडर्स मधला सामना

**आणि**

- दोहा डायमंड लीगमध्ये पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत भारताच्या नीरज चोप्राला रौप्यपदक

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ पाठवणार आहे. या महिन्याच्या अखेरीला सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्यांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देतील. या प्रतिनिधी मंडळात विविध राजकीय पक्षांचे खासदार, प्रमुख राजकीय व्यक्तिमत्व आणि प्रतिष्ठित राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश असेल. भाजपचे रवी शंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, काँग्रेसचे शशी थरूर, जदयूचे संजय कुमार झा, डीएमके च्या कनिमोळी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे श्रीकांत शिंदे हे सात नेते आपापल्या प्रतिनिधिमंडळांचं नेतृत्व करतील.

ही सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं दहशतवादाविरोधातला भारताचा शून्य सहिष्णुता दृष्टिकोन जगासमोर मांडतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राजकीय मतभेदांच्या पलीकडे, राष्ट्रीय एकतेचं हे शक्तिशाली प्रतीक असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय सेनादलांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. महाराष्ट्रातही जनसामान्यांमधे ऑपरेशन सिंदूर बद्द्ल अभिमान आणि गौरवाची भावना व्यक्त होत आहे. **गडचिरोली** जिल्ह्यातल्या एका नागरिकांनी आपली प्रतिक्रीया दिली....

**होल्ड- बाईट-**

**हिंगोली** इथे गांधी चौकातून काढलेल्या तिरंगा यात्रेत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार तानाजी मुटकुळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि नागरिक सहभागी झाले होते. **सांगली** शहरात हुतात्मा चौकातून निघालेल्या तिरंगा यात्रेत आमदार सुधीर गाडगीळ यांच्यासह अनेक नागरिक तिरंगी झेंडे घेऊन सहभागी झाले होते. **कोल्हापूर** शहरातल्या दसरा चौकातून आज सकाळी निघालेल्या तिरंगा यात्रेत खासदार धनंजय महाडिक , आमदार अमल महाडिक, भाजपचे पदाधिकारी आणि अनेक नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मध्य आणि उत्तर काश्मीरमध्ये सोपोर, बारामुला, हंदवाड़ा, गंदेरबाल, श्रीनगरसह अनेक ठिकाणी राज्य तपास संस्थेकडून आज छापे टाकण्यात येत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादी कारवायांना रोखण्यासाठी तपास संस्थानी काश्मीरमध्ये छापेमारी आणि चौकशी सत्र सुरु केले आहे.

**<><><><><>**

जनता दरबारात आपले प्रश्न सोडवले जातील अशा विश्वासाने नागरिक मोठ्या प्रमाणात याउपक्रमात सहभागी होतात असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूरमधे हैदराबाद हाऊस इथं आयोजित जनता दरबाराच्या वेळी ते बोलत होते. या दरबारात सादर होणाऱ्या जनसामान्यांच्या अडी अडचणी संबंधित विभागांकडे पाठवल्या जातात आणि त्या बाबत पाठपुरावाही केला जातो असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याशी संबंधित ठिकाणांचं दर्शन घडवणारं 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या मार्गावर रेल्वे गाडी चालवण्यात येणार आहे . भारत गौरव टूरीस्ट ट्रेन अंतर्गत आयोजित ही रेल्वे सहल येत्या नऊ जूनपासून सुरू होणार असल्याची माहिती राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मुंबईहून निघणाऱ्या या पाच दिवसांच्या विशेष सहलीत ही रेल्वे रायगड, पुणे, शिवनेरी, भीमाशंकर, प्रतापगड, कोल्हापूर आणि पन्हाळगडाला भेट देऊन मुंबईत दादरला परतणार आहे.

**<><><><><>**

एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आयएसआय या बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनेच्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना अटक केली आहे. २०२३ साली महाराष्ट्रात पुणे इथं आयईडी ही स्फोटकं बनवणं आणि त्याची चाचणी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एनआयए नं त्यांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली असून, ते इंडोनेशियाच्या जकार्ता इथून परतले होते. हे दोन्ही आरोपी गेली दोन वर्ष फरार होते आणि एनआयएच्या मुंबईतल्या विशेष न्यायालयानं त्यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंटही जारी केलं होतं. दोन्ही आरोपींची माहिती देणाऱ्यांना एनआयएनं प्रत्येकी ३ लाख रुपयांचं

रोख बक्षीस जाहीर केलं होतं. या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचं एनआयए च्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

दोहा डायमंड लीगमध्ये पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत भारताच्या नीरज चोप्रानं दुसरे स्थान पटकावलं. त्यानं ९० पूर्णांक २३ मीटरच्या विक्रमी अंतरापर्यंत भालाफेक करण्यात यश मिळवलं. जर्मनीच्या ज्युलियन वेबरनं ९१ पुर्णांक ६ शतांश मीटर अंतरावर फेक करत पहिलं स्थान पटकावलं. नीरजनं त्याच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच ९० मीटरचा टप्पा ओलांडला. ९० मीटरचा टप्पा पार केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्राचं अभिनंदन केलं आहे. ही सर्वोत्तम कामगिरी नीरजचं समर्पण, शिस्त आणि खेळाप्रति प्रेमाचा परिणाम असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, याच स्पर्धेत भारताच्या पारुल चौधरीनं महिलांच्या तीन हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात सहावं स्थान पटकावलं. तिनं नऊ मिनिटं १३ सेकंद आणि ३९ मायक्रो सेकंद वेळ नोंदवून स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडला.

**<><><><><>**

एका आठवड्यानंतर आज पुन्हा आयपीएल क्रिकेट स्पर्धा सुरू होत आहे. आज, यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामना बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियम इथं संध्याकाळी साडेसात वाजता होईल. यापूर्वी, भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळं नऊ मे रोजी आयपीएल स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. उर्वरित सामन्यांचं नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. मोहाली आणि धरमशाला इथं आता सामने होणार नाहीत. २५ मे रोजी होणारा अंतिम सामना आता ३ जून रोजी होणार आहे. प्लेऑफ सामन्याची ठिकाणं यथावकाश जाहीर होतील.

**<><><><><>**

मुंबईत वानखेडे मैदानावर क्रिकेटपटू रोहित शर्मा याच्या नावानं उभारण्यात आलेल्या स्टॅण्डचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल झालं. मुख्यमंत्र्यांनी रोहित शर्माच्या कामगिरीचं कौतुक केलं. मुंबई क्रिकेट संघटनेने एक लाख प्रेक्षक क्षमतेचं भव्य क्रिकेट मैदान उभारावं, संघटनेनं प्रस्ताव दिला, तर मैदानासाठी जागा उपलब्ध करून देण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं. माजी क्रिकेटपटू अजित वाडेकर आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नावाच्या स्टॅण्ड्सचंही यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँक लवकरच २० रुपये मूल्य असलेल्या नवीन नोटा चलनात आणणार आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची स्वाक्षरी या नोटांवर असेल. आर बी आय नं आज जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात ही माहिती दिली आहे. महात्मा गांधी मालिकेतल्या या नोटा आधीच्या नोटांसारख्याच आहेत तसंच याआधीच्या नोटाही चलनात लागू राहणार असून त्यांच्या वापरावर कोणताही परिणाम होणार नाही.

**<><><><><>**

बृहन्मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला '१०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा – फेज २' अंतर्गत ९५ मंडळ कार्यालयापैकी प्रथम क्रमांकानं गौरवण्यात आलं आहे. या आराखड्यांतर्गत संकेतस्थळ आणि डिजिटल सेवा सुलभता, केंद्र शासनाशी सुसंवाद आणि निधी प्राप्ती, स्वच्छता आणि दस्तऐवज व्यवस्थापन, तक्रार निवारण आणि अभ्यागत सुविधा, कार्यालयीन कार्यपद्धती सुधारणा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक आणि औद्योगिक गुंतवणुकीला प्रोत्साहन यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आधार क्रमांकानं प्रमाणित केलेल्या देशभरातल्या आतापर्यंतच्या व्यवहारांची संख्या १५० अब्जांहून अधिक झाली असून आधार परिसंस्थेसाठी हा एक

महत्त्वाचा टप्पा असल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं एका पत्रकात म्हटलं आहे. या वर्षी एप्रिल महिन्यात २१० कोटी आधार प्रमाणित व्यवहार झाले असून गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत ते ८ टक्क्यांनी वाढले असल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

//<><><><><>//